महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

# तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे कार्यालय, उरण जि. रायगड

Office of the Tahasildar & Executive Magistrate,Uran Dist-Raigad

दुरध्वनी/फॅक्स क्र : 022-27222352 Email-tahasiluran@gmail.com

| जा.क्र.जमिनबाब/कात-१/शासकीय जमिन/वनजमिन/माहिती/१०/२०२१ | दिनांक - २९/१०/२०२१ |
|---|---|

**प्रति,**

तलाठी सजा विंधणे, कोप्रोली, जुई,
चिरनेर, पिरकोन, आवरे, वशेणी

**विषय :-** खोपटा नव नगर क्षेत्रामधील शासकीय व वन जमिनींचा तपशिल मिळणेबाबत.

**संदर्भ :-** मा.अतिरिक्त जिल्हाधिकारी तथा मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (नैना) यांचकडील पत्र क्र.सिडको/मु.भू.व भू.अ./नैना/२०२१/१४३ दि.२५.१०.२०२१.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४०(१)(ब) अन्वये खोपटा नव नगर या क्षेत्रासाठी दि.१३.११.२००३ अन्वये रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील २५ व पनवेल तालुक्यातील ७ अशा एकुण ३२ गावांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने खोपटा नव नगर क्षेत्रातील गावांचा विकास आराखडा तयार करण्याचे निर्देश शासनाने दिलेले असल्याने सदर प्रकरणी खोपटा नव नगर क्षेत्रामध्ये समाविष्ट असलेल्या सोबत जोडलेल्या यादीतील गावामधील शासकीय व वन जमिनी यांचा तपशिल सादर करणेबाबत मा.अतिरिक्त जिल्हाधिकारी तथा मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (नैना) यांनी संदर्भिय पत्रान्वये या कार्यालयास कळविले आहे. सोबत संदर्भिय पत्राची प्रत जोडली आहे.

तरी सदर प्रकरणी खोपटा नव नगर क्षेत्रामध्ये समाविष्ट असलेल्या सोबत जोडलेल्या यादीतील गावामधील शासकीय व वन जमिनीची माहिती खाली दिलेल्या नमुन्यात **DVBW-TTSurekh या फॉन्टमध्ये** तयार करुन हॉर्डकॉपी व सॉफ्टसह तसेच ७/१२ उतारेसह आपला अहवाल या कार्यालयाकडे **चार रोजात** सादर करावा.

| अ.क्र. | गावाचे नांव | स.नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर.) | कब्जेदार सदरी असलेले नाव | सद्यस्थितीत वापर | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |

**तहसिलदार उरण**

सिडको
शहरांचे शिल्पकार

# शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित

(सीआयएन - यु ९९९९९ एमएच १९७० एसजीसी - ०१४५७४)

**नोंदणीकृत कार्यालय :**
'निर्मल' दुसरा मजला, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी : ००-९१-२२-६६५० ०९००
फॅक्स : ००-९१-२२-२२०२ २५०९

**मुख्य कार्यालय :**
'सिडको' भवन, सी.बी.डी. बेलापूर,
नवी मुंबई ४०० ६१४.
दूरध्वनी : ००-९१-२२-६७९१ ८१००
फॅक्स : ००-९१-२२-६७९१ ८१६६

**क्र.सिडको/मु.भू. व भू.अ./नैना/२०२१/ ९६३** **दि. २५.१०.२०२१.**

संदर्भ क्र. दिनांक :

**प्रति,**

**तहसिलदार, उरण**
**तहसिल कार्यालय, उरण पोलिस स्टेशन जवळ,**
**उरण, जि. रायगड - ४००७०२.**

**विषय : खोपटा नव नगर क्षेत्रामधील शासकिय व वन जमिनींचा तपशिल मिळणे बाबत.**

**संदर्भ : महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र.टिपीएस-१२०९/९३२/सीआर-३९०/०९/यु.डी.-१२, दि. ०४.०४.२०१२.**

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४० (१) (ब) अन्वये खोपटा नव नगर या क्षेत्रासाठी दि. १३.११.२००३ आणि दि. २२.११.२००५ रोजीच्या अधिसूचनेनुसार सिडको महामंडळाची विशेष नियोजन प्राधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. या क्षेत्रामध्ये रायगड जिल्हयातील उरण तालुक्यातील २५ व पनवेल तालुक्यातील ७ अश्या एकुण ३२ गावांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यानुसार खोपटा नव नगर क्षेत्रातील ६ गावांसाठी सिडकोने विकास आराखडा तयार केलेला असून उपरोक्त संदर्भिय अधिसूचनेद्वारे शासनाने मान्यता दिलेली आहे.

तथापी खोपटा नव नगर क्षेत्रातील उर्ववरीत २६ गावांचादेखील विकास आराखडा तयार करण्याचे निर्देश शासनाने दिलेले असून प्रकरणी लवकरात लवकर कार्यवाही पूर्ण करण्याचे विचाराधिन आहे. त्यानुसार सदर कामी खोपटा नव नगर क्षेत्रामध्ये समाविष्ट असलेल्या शासकिय व वन जमिनी यांचा तपशिल आवश्यक आहे.

सबब, आपणांस विनंती करण्यात येते की, खोपटा नवनगर क्षेत्रामध्ये समाविष्ट असलेल्या सोबत जोडण्यात आलेल्या यादीतील गावांतील शासकिय व वन जमिनींचा तपशिल प्रामाणित प्रतींसह तात्काळ या विभागास देण्यात यावा. जेणेकरुन पुढील कार्यवाही करणे सोईचे होईल.

**सोबत : खोपटा नव नगर क्षेत्रामध्ये समाविष्ट असलेल्या गावांची यादी.**

प्रा. | दु. | नि
तहसिल कार्यालय उरण
दि. २८/१०/२१
वर्गीकरण लिपीक | नं. त. | तहसिलदार

**अतिरिक्त जिल्हाधिकारी तथा**
**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (नैना)**

**प्रत : मुख्य नियोजनकार (नैना)**

भ्रष्टाचारासंबंधी कुठल्याही तक्रारीसाठी कृपया या संकेतस्थळाला भेट द्यावी.
**www.cidco.maharashtra.gov.in** दक्षता या लिंकवर क्लिक करावे.

Khopta New Town Village List

| Sr. No. | Taluka | Village Name |
|---|---|---|
| 1 | Uran | Vindhane |
| 2 | Uran | Harishchandra Pimpal |
| 3 | Uran | Bori Bk. |
| 4 | Uran | Boricha Kotha |
| 5 | Uran | Dhasakhosi |
| 6 | Uran | Jui |
| 7 | Uran | Chikhali Bhom |
| 8 | Uran | Bhom |
| 9 | Uran | Chirner |
| 10 | Uran | Kalambusare |
| 11 | Uran | Koproli |
| 12 | Uran | Bandhpada |
| 13 | Uran | Kacherpada |
| 14 | Uran | Talbandkhar |
| 15 | Uran | Pirkone |
| 16 | Uran | Sangpalekhar |
| 17 | Uran | Govthane |
| 18 | Uran | Pale |
| 19 | Uran | Sarde |
| 20 | Uran | Vasheni |
| 21 | Uran | Punade |
| 22 | Uran | Juipunade |
| 23 | Uran | Antrabamdakhar |
| 24 | Uran | Kadape |
| 25 | Uran | Aware |
| 26 | Panvel | Karnala |
| 27 | Panvel | Barapada |
| 28 | Panvel | Dighati |
| 29 | Panvel | Kelavane |
| 30 | Panvel | Sai |
| 31 | Panvel | Kasar Bhat |
| 32 | Panvel | Dolghar |